
# दसरा सण मोठा..




दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा. आपल्या हिंदू सणातील प्रमुख साडेतीन मुहूर्तांपैकी एक महत्वाचा मुहूर्त असलेला हा दसरा सण. अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवरात्रीची घटस्थापना होते, त्या नवरात्रीची सांगता दसऱ्याला होते. नुकत्याच सरत असलेल्या वर्षा ऋतूमुळे निसर्ग छान हिरवागार बहरलेला असतो आणि त्यात बहरलेली पिवळी, भगव्या रंगाची झेंडूची फुलं दसऱ्याच्या सणाला एक नवं चैतन्य बहाल करतात.

दसरा सण म्हटलं की आठवते ती लहानपणापासून सुरू असलेली पाटीची पूजा. घरातील दगडी पाटी, कोळश्याने घासून छान काळी करायची आणि ती धुवून पुसून पूजेसाठी तयार करायची. पांढऱ्या शुभ्र खडूने अथवा पेन्सिलने त्यावर सरस्वती काढून त्याची हळद कुंकू वाहून आणि झेंडूची फुलं वाहत यथोचित पूजा करायची. कालानुरूप दगडी पाट्या गेल्या मात्र त्या आठवणी आणि ती परंपरा पुढच्या पिढीपर्यंत परिवर्तित झाली आहे, याचे समाधान वाटते. भले पुस्तकाची अथवा संगणकाची पूजा केली जाते, पण सरस्वती पूजन ही एक दसऱ्याच्या परंपरा आहे.

दसऱ्याला दारावर झेंडूच्या फुलांचे आणि आंब्याच्या डहाळीचे तोरण उभारून जणू मांगल्याची प्रचिती येते. तसेच आपली उपकरणे, वाहने यांना झेंडूच्या फुलांच्या माळांनी सजवत त्यांची विधिवत पूजा करणे हा दसऱ्याचा महत्वाचा उपक्रम. आपल्या हिंदू सणांमध्ये सजीव वस्तूंसोबत निर्जीव वस्तूंची पूजा केली जाते, त्यामागे ती उपकरणे जी सेवा देतात त्यासाठी जणू कृतज्ञता व्यक्त करण्याची एक संधी असते.

दसरा म्हटलं की शस्त्रपूजन हा महत्वाचा भाग. महाभारतातील कालावधीत पांडवांचा वनवासाच्या कालावधीत, पांडवांनी आपली शस्त्रे शमी झाडाच्या ढोलीत ठेवली होती. विजयादशमीच्या दिवशी त्यांनी ती शस्त्रे पुन्हा ढोलीतून काढली आणि त्याची विधिवत शस्त्रपूजा केली होती. त्या परंपरेचा मान राखत विजयादशमीला शस्त्रांचे पूजन करण्याची परंपरा सुरू आहे. भारतात जिथेजिथे अद्याप राजघराणे अस्तित्वात आहे तिथे विजयादशमी हा सण, हा शस्त्रपूजनाने आणि शाही मिरवणुकीने साजरा केला जातो. म्हैसूर येथील विजयादशमीचा सोहळा हे सगळ्या भारतातील आकर्षण केंद्र आहे. येथील शस्त्रपूजन आणि म्हैसूर राजघराण्यातील महाराजांची शाही मिरवणूक हा परंपरागत विजयादशमीचा सण साजरा करण्याचा फक्त भाग राहिला नसून ते एक पर्यटकांचे खास आकर्षण ठरलेले आहे. तीच शस्त्रपूजेची परंपरा आणि शाही मिरवणूक कोल्हापूरला आणि बडोद्याच्या राजघराण्याची खास ओळख ठरते. कोल्हापूरला तर दसरा चौक असे एका चौकाचे नामकरण आहे.

दसरा म्हटलं की रावण दहन हा महत्वाचा भाग. उत्तरेकडे रामलीला मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. त्या रामलीलेची सांगता रावण दहनाने होते. दिल्लीला तर रामलीला मैदान आहे, त्याठिकाणी रावण दहनाचा मोठा कार्यक्रम साजरा केला जातो. तसा रावण दहनाचा कार्यक्रम भारतात ठिकठिकाणी साजरा केला जातो पण उत्तरेकडे त्याचे जरा मोठे प्रस्थ आहे. रावण हा मोठा शिवभक्त परंतु त्याच्या अंगी असलेल्या अहंकाराने त्याने अनेक साधू संत आणि सज्जनांना त्रास दिला. त्याच अहंकारापायी सीताहरण, ज्यामुळे पुढचं रामायण घडलं, त्या रावणाच्या दुष्ट प्रवृत्तीवर मात करत प्रभू रामचंद्रांनी रावणावर विजय मिळवला. त्याचे प्रतिक म्हणून विजयादशमीला रावण दहन केले जाते. रावण दशमुखी - जणू विवशता, क्रोध, लोभ, अहंकार, ईर्ष्या, द्वेष, निराशा, संशय, मोह आणि आळस ह्या दहा वाईट प्रवृत्तींचे प्रतिक. रावण दहन हे फक्त त्या रावणाच्या प्रतिमेचे, पुतळ्याचे दहन नसून, जणू माणसाने त्याच्या ठायी असलेल्या ह्या दहा प्रवृत्तींवर मात करायला हवी ह्याचाच जणू बोध द्यावा यासाठी हे रावण दहन करावे. मानवी स्वभावातील ह्या दहा अनिष्ट स्वभावांवर मात करत त्याचे समूळ उच्चाटन करत त्या जागी चिकाटी, क्षमाशीलता, नम्रता, दयाळू भाव, स्नेह, आशा, धैर्य, विवेक आणि निग्रह ह्या सत्प्रवृत्तींना थारा देण्यासाठी जणू ही प्रथा जोपासावी कारण शेवटी प्रत्येक व्यक्तीने रामासारखे सदाचरण राखले तर समाजात रावणासारख्या दुष्ट प्रवृत्तींना थारा मिळणार नाही.

दसरा आणि आपट्याची पानं ह्यांच अनोखं नात. ज्या शमीच्या झाडाच्या ढोलीत पांडवांनी त्यांची शस्त्रं ठेवली होती त्या शमीच्या पानाचे आणि आपट्याच्या पानाचे दसऱ्याला विशेष महत्व. शमीच्या पानांमध्ये तेज कण आणि आपट्याच्या पानात आप आणि तेज कणांचा वास असतो असे मानतात. त्यामुळे शमी आणि आपट्याच्या पानांचे दसऱ्याला विशेष महत्व. आपट्याची पानं हे जणू सोन्याचे प्रतीक मानले जाते, त्यामुळे आपट्याची पानं एकमेकांना देत एकमेकांना समृध्दीसाठी आणि

ऐश्वर्यासाठी जणू शुभेच्छा दिल्या जातात. आपट्याच्या पानाचा आकार जणू हृदयासारखा वाटतो. त्यामुळे ही आपट्याची पानं जणू स्नेह आणि प्रेम भावनेचे प्रतिक वाटते. विजयादशमीच्या संध्येला ह्या आपट्याच्या पानांची देवाणघेवाण करत सीमोल्लंनघन करणे ही दसऱ्याच्या मोठी प्रथा आहे. सीमोल्लंघन हे विजयाचे प्रतिक आहे. दसऱ्याला सीमोल्लंघन करताना, गावाच्या वेशीचे सीमोल्लंघन करणे अश्या प्रातिनिधिक रूपात दसरा हा सण साजरा केला जातो. हे सीमोल्लंघन मात्र फक्त सीमेपुरते मर्यादित राहू नये. ह्यात विचारांचे सीमोल्लंघन सुद्धा व्हावे. मनातील नकारात्मक विचारांवर मात करत, षड्रिपुंवर मात करत, मनात स्नेहभावना, प्रेम, धैर्य, विवेक, आशा, नम्रता तसेच क्षमाशीलता जोपासत, अनिष्ट विचारांचे सीमोल्लंघन व्हावे. बऱ्याच वेळा मनात नकारात्मक विचारसरणीमुळे आपणच आपल्या क्षमतांचे कुंपण तयार करतो. बऱ्याच वेळा, 'मला हे जमणार नाही, मी हे करू शकणार नाही, माझे हे काम करण्याची क्षमता नाही' अश्या नकारात्मक विचारांमुळे जणू आपणच आपल्या भोवती, आपल्या क्षमतेचे कुंपण तयार करतो, ज्यामुळे नवीन क्षेत्रात प्रवेश करू शकत नाही. अश्या मनातील आभासी नकारात्मक विचारांचे सीमोल्लंघन करणे गरजेचे आहे, जेणेकरून आपणच आपल्या क्षमतेचे क्षितिज विस्तारत नवीन अवकाशात भ्रमण करण्यासाठी सज्ज होता येईल.

**- मनोज कुरुंभटी**